समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता...

# संघर्षनेता

https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे

बीड वर्षे- 10 वे | अंक क्र. 214 रविवार दि. 17 ऑगस्ट 2025 पृष्ठे 4 किंमत 2 ₹ RNI: MAHMAR/2016/67060

या जागेवर आपल्या संस्था,फर्मची जाहिरात घेणे आहे

## बीड जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी राज्य शासन कटिबद्ध - उपमुख्यमंत्री अजित पवार

### सर्वांच्या सहकार्याने बीड जिल्ह्याचा सर्वांगिण विकास करुन चेहरा-मोहरा बदलणार

### 17 सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनी बीड-अहिल्यानगर' रेल्वे सुरु होणार





बीड, दि.15 (जिमाका) : बीड जिल्ह्याचा कृषी, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, आर्थिक, सांस्कृतिक, उद्योग व क्रीडा आदी क्षेत्रातील सर्वांगिण विकासासाठी राज्य शासन कटिबध्द असून, जिल्ह्याचा पालकमंत्री म्हणुन याकरीता सर्वत्तोपरी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात 79 व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त उपमुख्यमंत्री श्री. पवार यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा पार पडला, त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आमदार सर्वश्री संदीप क्षीरसागर, पान 3 वर

## जालना जिल्हा विकासात पहिल्या क्रमांकावर आणण्यासाठी कटीबध्द

### » स्वातंत्र्य दिनानिमित्त जालन्यात पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते ध्वजारोहण

जालना ।दिनांक 15। जालना शहर औद्योगिक शहर म्हणून झपाट्याने विकसित होत आहे. यापुढेही जालना जिल्ह्यात शासनाकडून विविध विकासात्मक कामे करुन आपल्याला विकास साधावयाचा आहे. तरी पालकमंत्री या नात्याने जालना जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी कटीबध्द राहील, असे प्रतिपादन राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय समारंभ पार पडला. यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल यांची प्रमुख उपस्थिती होती. तर यावेळी आमदार अर्जुन खोतकर, आमदार नारायण कुचे, आमदार हिकमत उढाण यांची उपस्थिती होती.

पालकमंत्री पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, जिल्ह्यात नूकत्याच पार पडलेल्या महसूल सप्ताहाच्या माध्यमातून जिल्ह्यात विविध उपक्रम राबविण्यात आले. जिल्हाभरात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान, वृक्ष लागवड, विविध दाखल्याचे वितरण, डिबीटीद्वारे लाभ, शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे पान 3 वर



## आज ठळक

## पँन्थर सोपनराव रोडे यांचे दु :खद निधन



परळी प्रतिनिधी फुले शाहू आंबेडकर चळवळीचे नेते पँन्थर सोपानराव रोडे यांचे शनिवार दि.16ऑंगस्ट रोजी पहाटे हृदयविकाराच्या धक्याने दुःखद निधन झाले असुन आंबेडकरी चळवळीचा ढाण्या वाघ काळाच्या पडद्याआड गेल्याने सर्वत्र शोककळा पसरली आहे.

सोपनराव रोडे यांचे फुले शाहू आंबेडकर चळवळीला मोठे योगदान राहिले आहे भिमनगरचा आधारवड कोसळला. रोडे कुटुंबाचे आधारस्तंभ सोपानराव रोडे (आण्णा) यांचे दुःखद निधन शनिवारी सकाळी पहाटे 5 वाजता हृदयविकाराच्या झटक्याने प्राणज्योत मालवली. शनिवारी सायंकाळी 5 वाजता शांतीवन स्मशानभूमी भीम नगर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात संघपाल(बॅली) भाऊ, जयपाल(बबलू) रोडे यांचे वडील व नगरसेवक नितीन भाऊ रोडे यांचे चुलते होत.

## वैद्यनाथ बँकेच्या नवनिर्वाचित संचालक मंडळाचा मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते सत्कार संपन्न



परळी / प्रतिनिधी वैद्यनाथ को-ऑपरेटिव्ह बँकेच्या नवनिर्वाचित संचालक मंडळाचा जालना येथील वैद्यनाथ बँकेचे व्हाइस चेअरमन रमेश कराड यांचे जिवलग मित्र माजी मंत्री आ.अर्जुन खोतकर यांच्या निवासस्थानी पर्यावरण व वातावरणीय बदल आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते सत्कार संपन्न झाला यावेळी पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते शाल ,हार घालून सर्व संचालकाचा सत्कार करण्यात आला यावेळी बँकेतील सर्व संचालक उपस्थित होते.

## अमेर पठाण पांगरी च्या पुलात गेला वाहुन



परळी प्रतिनिधी

अमेर अजमेर पठाण वय 25 वर्ष रा बरकतनगर परळी वै हा तरुण पोकलेन ऑपरेटर पांगरी येथील नदीवर संरक्षण भिंतीचे काम करत असताना पुराच्या पाण्यात वाहून गेला व मयत झाला.बॉडी शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी ठेवण्यात आली आहे.

## जालन्यात रंगला गोर बंजारा तिज महोत्सव – ना.पंकजाताई मुंडे यांची उपस्थिती ठरली आकर्षणाचा केंद्रबिंदू



जालना ।दिनांक 15।

सामाजिक एकतेचा संदेश देणाऱ्या गोर बंजारा समाजाच्या तिज महोत्सव शहरातील सोरटी नगर येथे आजपासून सुरु झाला. पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी सकाळी विशेष हजेरी लावल्याने या महोत्सवाला अधिक रंगत आली. पारंपरिक वेषभूषेत सहभागी झालेल्या बंजारा महिलांसोबत पंकजाताई मुंडे याठिकाणी रमल्या, त्यामुळे त्यांची उपस्थिती आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली.

आमदार राजेश राठोड यांच्या विशेष आमंत्रणावरुन जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी सोरटी नगर, अंबड चौफुली येथे या उत्सवाला भेट दिली. पारंपरिक वाद्यांच्या गजरात आणि जल्लोषात त्यांचे स्वागत करण्यात आले.पारंपरिक वेशभूषा, पारंपरिक खाद्यपदार्थ आणि रंगीबेरंगी झांजपथकांनी संपूर्ण वातावरण भारावून गेले होते.बंजारा महिलांचे पारंपरिक लेंगा-चोळी परिधान करत साजरे केलेले तिज नृत्य यामध्ये काहीकाळ पंकजाताई मुंडे रममाण झाल्या. पंकजाताईंनी महोत्सवात सहभाग घेतल्यावर उपस्थित बंजारा बांधवांशी आत्मियतेने संवाद साधला. यामुळे बंजारा समाज बांधवांचा उत्साह द्विगुणित झाला होता.

त्यांनी बंजारा समाजाच्या सांस्कृतिक वारशाचे आणि एकतेचे कौतुक केले. गोर बंजारा समाजाच्या संस्कृतीतील ही तिज परंपरा ही पान 3 वर

## वैद्यनाथ बँकेच्या नवनिर्वाचित संचालक मंडळाचा मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते सत्कार संपन्न.



परळी / प्रतिनिधी वैद्यनाथ को-ऑपरेटिव्ह बँकेच्या नवनिर्वाचित संचालक मंडळाचा जालना येथील वैद्यनाथ बँकेचे व्हाइस चेअरमन रमेश कराड यांचे जिवलग मित्र माजी मंत्री आ.अर्जुन खोतकर यांच्या निवासस्थानी पर्यावरण व वातावरणीय बदल आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते सत्कार संपन्न झाला यावेळी पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते शाल ,हार घालून सर्व संचालकाचा सत्कार करण्यात आला यावेळी बँकेतील सर्व संचालक उपस्थित होते.

## तिरंग्याच्या साक्षीने देशभक्तीचा जल्लोष प्रा.टी.पी.मुंडे यांच्या हस्ते जवाहरलाल नेहरू महाविद्यालयात ध्वजारोहण संपन्न !



परळी, ता. 15 – जवाहरलाल महाविद्यालयात 79 वा स्वातंत्र्यदिन देशभक्तीच्या वातावरणात उत्साहाने साजरा करण्यात आला. वसंतराव नाईक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा ओबीसी नेते प्रा. टी.पी. मुंडे (सर) यांच्या हस्ते तिरंग्याचे ध्वजारोहण संपन्न झाले. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रपिता महात्मा गांधी, स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु आणि भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाली.

'जय हिंद'च्या घोषणांनी महाविद्यालयाचा परिसर दुमदुमून गेला. ऐक्य, स्वातंत्र्याचा अभिमान आणि देशसेवेचा संकल्प घेऊन हा सोहळा संस्मरणीय ठरला.

यावेळी शिवरत्न काका मुंडे, गाडे गुरुजी,भीमराव मुंडे,अनिल मस्के, महेश बँकेचे अध्यक्ष ओमप्रकाश सारडा, दत्तात्रय ढवळे, सुदाम लोखंडे, अँड. संजय जगतकर, पंडित झिंजुर्डे, मार्केट कमिटीचे उपसभापती प्रा. पान 3 वर

## लैच चुरु चुरु बोलायला लागला... भावकीकडे लक्ष दिलं म्हणूनच तू आमदार झाला;

### अजितदादांनी स्टेजवरच कुणाला सुनावलं?



सांगलीतील इस्लामपूरमध्ये महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या प्रा. डॉ. एन.डी. पाटील विधी महाविद्यालय, श्रीमती सरोज नारायण पाटील (माई) मानसशास्त्र संशोधन केंद्र आणि प्रा. डॉ. एन. डी. पाटील बहुउद्देशीय सभागृहाचा उद्घाटन सोहळा पार पडला. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह आमदार रोहित पवार, जयंत पाटील, चंद्रकांत पाटील हे नेते उपस्थित होते. यावेळी भाषण करताना अजित पवार यांनी आमदार रोहित पवार यांना , 'लैच पान 3 वर

## राजन विचारे यांची दोन्ही ठाकरे बंधूंच्या युतीबाबत प्रतिक्रिया; म्हणाले, "यह फेविकॉल का जोड है, टुटेगा नही.."




दहीहंडीनिमित्त आज संबंध महाराष्ट्रात जल्लोष आणि उत्सहाचे वातावरण आहे. अनेक दिवसांपासून सर्वाधिक थर लावण्याचा सराव करणारे गोविंदा पथक आज विविध ठिकाणी थर लावून बक्षीस मिळविण्याचा प्रयत्न करताना दिसतील. ठाणे शहरात सकाळ पासून ठाण्यासह मुंबईतील गोविंदा पथक दाखल झाले आहेत. विविध दहीहंडी आयोजकांकडे या पथकांनी थर रचले. त्यातील काहीजणाचे थर अचूक लागले तर, काहींचे कोसळले. पण,या चुरशीमध्ये पाच ते सहा गोविंदा जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. यातील तीन गोविंदांवर पान 3 वर

## ष.ब्र.108 गुरू शंकरलिंग शिवाचार्य महाराजांच्या 21 दिवसीय मौन तपोनुष्ठानाची सांगता



परळी (प्रतिनिधी) :प्रभू श्री वैद्यनाथाच्या पुण्यनगरीत श्रावणमासात भक्तिभावाने रंगलेले 16 वे मौन तपोनुष्ठान शनिवारी (ता.16 ऑगस्ट) सुफळ संपूर्ण झाले. लातूर जिल्ह्यातील शिरूर अनंतपाळ तालुक्यातील खरोळा येथील श्री 108 श्री शंकरलिंग शिवाचार्य महाराजांनी श्री संत गुरुलिंग स्वामी मठ संस्थान (बेलवाडी) येथे 21 दिवस मौनव्रत साधना केली.

25 जुलै रोजी मिरवणुकीने शहरात भव्य स्वागत झाल्यानंतर 26 जुलैपासून हे तपोनुष्ठान सुरु झाले होते. सांगता सोहळ्यात शनिवारी पहाटे शिवाचार्य महाराजांनी प्रभू वैद्यनाथाचे अभिषेक दर्शन घेतले. त्यानंतर मठात श्री महादेव ईटके, व सौ.माधुरी ईटके यांच्या हस्ते आरती झाली व शि.भ.प. विश्वनाथ स्वामी वडवळकर यांचे कीर्तन रंगले.

मौनव्रत सोडल्यानंतर शिवाचार्य महाराज भावुकतेने पान 3 वर

## भारत लवकरच दुसरी महासत्ता बणणार-फुलचंदराव कराड

### भारताला कोणत्याही देशाने कमी समजु नये,संत भगवानबाबा विद्यालयात कराड यांच्या हस्ते ध्वजारोहण



परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

भारताची सध्या आर्थिक प्रगती पहाता लवकरच अमेरिकेनंतर जगातील दुसरी महासत्ता म्हणुन भारत उदयास येईल तसेच भारताचे सैन्य जगातील बलाढ्य सैन्य म्हणुन ओळखले जाते यामुळे पाकिस्तानचे नेते युध्दाची भाषा बोलत असले तरी भारताबरोबर थेट युध्द करण्याची पाकिस्तानची हिंमत नसल्याचे प्रतिपादन भगवान सेनेचे सरसेनापती,संत भगवानबाबा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे जेष्ठ नेते फुलचंदराव कराड यांनी केले.

पांगरी कॅम्प येथील संत भगवानबाबा प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात 15 ऑगस्ट रोजी फुलचंदराव कराड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी बोलताना कराड म्हणाले की,सध्या भारताची चौफेर आर्थिक प्रगती होत आहे. काही वर्षातच भारत रशिया व चिनच्या पुढे जाऊ शकतो.भारताच्या या प्रगतीत चीनला रोखण्यासाठी पान 3 वर

## महाराष्ट्र विधानपरिषद सभापती राम शिंदे यांचा दौरा कार्यक्रम

बीड, दिनांक 16 (जिमाका) : महाराष्ट्र विधान परिषद सभापती राम शिंदे बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत, त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे असणार आहे.

दिनांक 17 ऑगस्ट रोजी सकाळी 7.30 वाजता शासकीय विश्रामगृह अहिल्यानगर येथून शासकीय वाहनाने पिंप्री (घुमरी) ता. आष्टी, जि. बीड कडे प्रयाण. सकाळी 8.30 वा पिंप्री (घुमरी) ता. आष्टी, जि. बीड येथे आगमन व



श्रीमती अश्विनी देवराव परकाळे यांची यु.पी.एस.सी. मध्ये IFS पदी निवड पान 3 वर

# कुंभ ते सिंह : माझ्या राशींचा प्रवास!

**डॉ. दशरथ भोसले**

**ही कथा एका माणसाच्या "राशी प्रवासाची" आहे— जन्मापासून कधी कुंभ, कधी मीन, तर कधी सिंह असा प्रवास! पत्रिका, गुरुजी, पंचांग, आणि शेवटी व्हॉट्सॲप भविष्य यांच्या गमतीजमतीतून ही कथा हलक्याफुलक्या विनोदात आपल्याला सांगते की नशीब राशीनं नाही, तर जगण्याच्या आनंदानं ठरतं.**

## कथा:

माझी आई जुन्या काळातील 'व्हर्नाक्युलर फायनल' पास असल्याने नगरपालिकेच्या शाळेत तिला शिक्षिकेची नोकरी मिळाली होती. लग्न झाले. वडील म्हणाले, "मी नोकरी करतो. पत्नीने नोकरी करणे म्हणजे माझ्यातील पुरुषार्थाला ते शोभत नाही." पतीचा आदेश शिरसावंध्य मानून आईने नोकरी सोडली. माझा जन्म झाला.

आईकडे त्या काळातील महागडा, शाईचा 'सम्राट' पेन होता. तिने पंचांगावर सविस्तर लिहून ठेवले— "बाळाचा जन्म रविवार, दिनांक 12 ऑक्टोबर 1947, सकाळी सूर्योदयानंतर 6 वाजून 45 मिनिटांनी झाला. नवरात्र सुरु होते. नवरात्रीतील सातवी माळ होती." एवढे सविस्तर लिहिल्यावर वडिलांनी नृसिंह मंदिरातील एका ब्रह्मवृंदाकडून माझी जन्मकुंडली करून घेतली. त्यांनी माझी रास "कुंभ" असल्याचे लिहून दिले.

मी मॅट्रिक झालो. अधूनमधून 'कुंभ' राशीचे भविष्य वाचायचो, पण कोणतेच भविष्य लागू पडत नव्हते.

माझे लग्नायोग्य वय झाले. पहिली काढलेली जन्मपत्रिका खराब झाली होती. आता नवीन जन्मपत्रिका करायला हवी. चौकात घराजवळ एक भटजी होते— आम्ही त्यांना 'गुरुजी' म्हणायचो. ते मुहूर्त आणि ज्योतिष यात फारच अभ्यासू होते, असे म्हणतात. लग्नाचा मुहूर्त, बारशाचा मुहूर्त, ओटी भरण्याचा मुहूर्त, मुलीला सासरी पाठवण्याचा किंवा बाळंतपणासाठी माहेरी आणण्याचा मुहूर्त, घरात सत्यनारायण करण्याचा मुहूर्त— एवढेच कशाला, घरात कोणी आजारी पडल्यास तो लवकर बरा होण्यासाठी उपाययोजना, हरवलेली वस्तू कुठे आणि कधी सापडेल, मुलांची लग्ने कधी ठरतील, नोकरी कधी लागेल, बढती कधी मिळेल, गरोदर मुलीला काय होईल... असे सर्व भविष्य गुरुजी सांगायचे.

आया-बायांनी गुरुजींनी भविष्य सांगितले की, त्यांच्या पुढे सव्वा पाच रुपये ठेवून, डोक्यावरुन पदर घेऊन, पदराचे टोक हातात धरून पाया पडायच्या.

आई-वडिलांनी ह्याच गुरुजींकडून माझी जन्मपत्रिका करून घेण्याचे ठरवले. गुरुजींना माहिती दिली. त्यांनी सव्वा अकरा रुपये घेऊन माझी जन्मकुंडली तयार केली. आता माझी रास आली "मीन". मी गुरुजींना विचारले, "पूर्वीच्या गुरुजींनी माझी रास 'कुंभ' सांगितली, आपण म्हणता 'मीन'?" त्यावर गुरुजी म्हणाले, "त्यांचे गणित चुकीचे आहे. मी काढलेली मीन रासच बरोबर आहे."

घरी आईचे वय झालेले, वडील अंथरुणावर. वडिलांनी सांगितले, "मला सूनमुख बघितल्याशिवाय मरायचे नाही." माझ्यासाठी वधू संशोधन सुरु झाले. आईच्या दूरच्या नात्यातील, कमी शिकलेली पण नाकी-डोळी नीटस मुलगी आई-वडिलांनी माझ्यासाठी वाग्दत्त वधू म्हणून पसंत केली. त्या काळी मुलगा-मुलगी पसंत-नापसंत करण्याचा अधिकार मुलांकडे नसायचा—आई-वडील ठरवतील, तीच जोडी जमायची.

पत्रिका पाहण्यासाठी माझी 'मीन' राशीची पत्रिका घेऊन आई गुरुजींकडे गेली. मुलीची पत्रिका नव्हती. मग मार्ग निघाला—मुलाचे आणि मुलीचे चालू नाव सांगितले. गुरुजी म्हणाले, "चांगले जुळते." त्यांनी लग्नाचा मुहूर्तही काढून दिला. मुहूर्तावर लग्न झाले. आई-वडिलांनी पसंत केलेल्या, पण पत्रिका न पाहता पदरात पडलेल्या पत्नीसोबत माझा संसार सुखाचा आणि आनंदी झाला.

लग्नानंतर तीन वर्षांत वडिलांनी सूनमुख बघितले, दोन नातवंडे पाहिली आणि मुलाचे कर्तृत्व पाहून आनंदाने डोळे मिटले. यथावकाश लग्नाचा पन्नासावा वाढदिवस मुलांनी अतिशय धूमधडाक्यात साजरा केला.

यानंतर, आमच्या आमदार नातेवाईकांनी मला बोलावून घेतले आणि आदेश दिला, "नोकरीचा राजीनामा द्या. तुम्हाला जिल्हा परिषद निवडणूक लढवायची आहे." मी गडबडलो. "उद्या सांगतो" म्हणून पळ काढला. राजकारणात यश आहे का हे जाणून घेण्यासाठी गावातील वेदशास्त्र संपन्न गुरुजींना माझ्या जन्माची वेळ सांगितली. त्यांनी पत्रिका काढली आणि सांगितले—"तुमची सिंह रास आहे." माझे शंका निरसन करण्यासाठी त्यांनी 1947 सालचे पंचांग दाखवले आणि जन्मवेळेचा तपशील सिद्ध केला.

मी 'सेकंड ओपिनियन'साठी माझ्या मूळ गावी गेलो. तेथे गुरुजींना 'स्वामी' म्हणतात. मी स्वामींना म्हणालो, "माझी जन्मपत्रिका करायची आहे." स्वामी म्हणाले, "आता पन्नाशी उलटल्यावर कशाला पत्रिका करता?" कारण सांगताच ते म्हणाले, "बघायलाच नको, तुमच्या चेहऱ्याकडे पाहून सांगतो—तुमची सिंह रास आहे." आणि आता सिंह राशीचे भविष्य मला बरेच पटू लागले.

मी विचार करतो—माझी रास प्रथम 'कुंभ', मग 'मीन', आणि आता 'सिंह'! जन्मपत्रिकेवर कसा विश्वास ठेवायचा? पत्रिका न बघताच झालेले लग्न सुखाचे झाले. मुले चांगल्या मार्गाला लागली. सर्व काही सुरळीत चालू असतानाच करोनामुळे पत्नीचा मृत्यू झाला. थोड्या दिवसांत आम्ही सावरलो.

मित्रमंडळी माझ्या मागे लागली—"तू एकटा या बंगल्यात राहतोस. काही दुखले-खुपले तर कोण आहे? तुला चांगली पेन्शन आहे. तू मेल्यावर तुझी पेन्शन मुलांना मिळणार नाही. तू लग्न केलंस तर तुझ्या पत्नीला पेन्शन मिळेल, एखाद्या स्त्रीचे कल्याण होईल."

मनात चलबिचल सुरु झाली. एक दिवस मित्र आला म्हणाला, "व्हॉट्सॲपवर सिंह राशीचे भविष्य बघ, गुड न्यूज आहे!" मग मी दररोज साधू-संत, बुवा, भविष्यवेत्ते यांनी वर्तवलेले भविष्य वाचू लागलो.

सगळ्या भविष्यांनुसार—सिंह राशीच्या व्यक्तीच्या जीवनात लवकरच स्त्री-सुख येणार आहे. तीन महिला या राशीच्या व्यक्तीवर फिदा आहेत. एक महिला शेजारी राहते, दुसरी लांबच्या नात्यातली आहे, आणि तिसरी कॉलेज जीवनातील आहे. त्या स्त्रीच्या नावाचे इंग्रजी आद्याक्षर आर, एस किंवा एन असेल.

भविष्य वाचल्यापासून मी खूप आनंदात आहे. या अक्षराची कोण स्त्री माझ्या जीवनात येणार? मी रात्री उशिरापर्यंत वाट पाहत असतो, दिवसभर बंगल्याचा दरवाजा उघडा ठेवतो... आणि वाट पाहतोय—सिंह राशीचे माझे भविष्य कधी खरे ठरणार?

तात्पर्य: जन्मपत्रिका, रास किंवा भविष्य यावर आंधळा विश्वास न ठेवता, आपले आयुष्य आपण कसे जगतो यावरच खरे सुख अवलंबून असते. भविष्य सांगणाऱ्यांच्या बदलत्या गणितापेक्षा, नात्यांमधील जिव्हाळा आणि सकारात्मक दृष्टिकोन हेच खरं नशीब ठरवतात.

**डॉ. दशरथ भोसले,**
**विनोदी कथा लेखक, दापोली जिल्हा रत्नागिरी.**

# मधमाशी:फळे आणि बियांच्या निर्मितीत महत्त्वाची भूमिका!

## (17 ऑगस्ट:जागतिक मधमाशी दिन.)

**मधमाश्या या पृथ्वीवरील सर्वात महत्त्वाच्या परागीकरण करणाऱ्या कीटकांपैकी एक आहेत. त्या झाडांच्या फुलांमधील परागकण एकमेकांमध्ये नेऊन फळे आणि बियांच्या निर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे शेतीसाठी मधमाश्यांचे योगदान अनमोल आहे. परंतु, सध्या पर्यावरणातील बदल, रासायनिक कीटकनाशकांचा वापर आणि जंगलतोड यामुळे मधमाश्यांची संख्या कमी होत चालली आहे. जागतिक मधमाशी दिनाच्या निमित्ताने, आपण सर्वांनी एकत्र येऊन मधमाश्यांचे संरक्षण कसे करता येईल याचा विचार करावा. असा श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा खूपच मार्गदर्शक संकलित लेख वाचकांच्या सेवेत सादर.... संपादक.**

जागतिक मधमाशी दिन-वर्ल्ड हनी बी डे हा दिवस दरवर्षी ऑगस्ट महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश मधमाश्यांचे पर्यावरणातील महत्त्व, त्यांचे संरक्षण आणि त्यांच्या संवर्धनाबद्दल जागरूकता वाढवणे हा आहे. जैविक शेतीला प्रोत्साहन देणे, विषारी रसायनांचा वापर टाळणे आणि मधमाश्यांच्या वाढीसाठी पोषक वातावरण निर्माण करणे या गोष्टींमध्ये आपला सहभाग असावा. मधमाश्यांचे संवर्धन हे केवळ पर्यावरणासाठीच नाही तर मानवी अन्नसाखळीसाठीदेखील अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे जागतिक मधमाशी दिनाच्या निमित्ताने, आपण या छोट्या पण अत्यंत महत्त्वाच्या कीटकांसाठी आपली जबाबदारी ओळखून त्यांचे रक्षण करूया. मधमाश्या या पृथ्वीवरील सर्वात महत्त्वाच्या परागीकरण करणाऱ्या कीटकांपैकी एक आहेत. त्या झाडांच्या फुलांमधील परागकण एकमेकांमध्ये नेऊन फळे आणि बियांच्या निर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे शेतीसाठी मधमाश्यांचे योगदान अनमोल आहे. परंतु, सध्या पर्यावरणातील बदल, रासायनिक कीटकनाशकांचा वापर आणि जंगलतोड यामुळे मधमाश्यांची संख्या कमी होत चालली आहे. जागतिक मधमाशी दिनाच्या निमित्ताने, आपण सर्वांनी एकत्र येऊन मधमाश्यांचे संरक्षण कसे करता येईल याचा विचार करावा.

परागकणांना आज सघन शेती, कीटकनाशकांपासून हवामान बदलापर्यंत मुख्य आव्हानांचा सामना करावा लागतो. मधमाशांसाठी योग्य निवासस्थान नसल्यामुळे परागणात सतत घट होऊ शकते. मोनो-पीक, कीटकनाशके आणि हवामान बदलाशी संबंधित उच्च तापमान सर्व मधमाशी लोकसंख्येसाठी समस्या निर्माण करतात आणि विस्ताराने, आपण वाढवलेल्या अन्नाची गुणवत्ता. परागकण संकटाची परिमाणे, जैवविविधता आणि मानवी उपजीविकेशी असलेले त्याचे दुवे ओळखून, जैविक विविधतेच्या अधिवेशनाने परागकणांचे संरक्षण आणि शाश्वत वापर याला प्राधान्य दिले आहे. सन 2000मध्ये आंतरराष्ट्रीय परागकण पुढाकार आइपीआइची स्थापना सीओपी निर्णय वी/5, विभाग II पक्षांच्या पाचव्या परिषदेत सीओपी वी जगभरात समन्वित क्रियांना प्रोत्साहन देण्यासाठी क्रॉस-कटिंग उपक्रम म्हणून करण्यात आला. परागकण कमी होणे, त्याची कारणे आणि परागण सेवांवर होणारे परिणाम यांचे निरीक्षण करावे; परागकणांवर वर्गीकरणविषयक माहितीची कमतरता दूर करावी; परागणाचे आर्थिक मूल्य आणि परागण सेवा कमी होण्याच्या आर्थिक परिणामाचे मूल्यांकन करावे आणि कृषी आणि संबंधित परिसंस्थेतील परागकण विविधतेच्या संवर्धन, पुनर्संचयित आणि शाश्वत वापरास प्रोत्साहन द्यावे. मधमाश्या आणि इतर परागकणांची काळजी घेणे हा जागतिक भुकेविरुद्धच्या लढ्याचा एक भाग आहे.

मधमाशांचे मूल्य- मधमाश्या, फुलपाखरे, वटवाघुळे आणि हमिंगबर्ड्स हे परागीभवनास उपयुक्त जीवजंतू असून मानवी क्रियाकलापांमुळे त्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. परागीभवनामुळे विविध पिकांसह अनेक वनस्पतीं मध्ये प्रजोत्पादन होते. यामुळे विविध प्रकारचे बीज, फळे आणि फुले शाकाहारी प्राण्यांना व मानवास अन्न म्हणून प्राप्त होतात. जगभरातील चारपैकी तीन अन्नपिके ही परागीभवनावर अवलंबून असतात. जगात फुलपाखरू, पक्षी आणि वटवाघुळ यासारख्या विविध प्रजाती आहेत. यात सर्वात मोठे योगदान हे मधमाश्यांचे आहे. जगात मधमाशांच्या 25,0000 ते 30,000 प्रजाती आहेत. जगाच्या एकूण पीक उत्पादनात 35 टक्के योगदान हे मधमाशांचे आहे. जगभरातील 115 प्रमुख अन्न पिकांपैकी 87 पिके ही परागीभवनावर अवलंबून आहेत. विविध शत्रू कीटक, रासायनिक कीटकनाशके, जमिनीची यांत्रिक मशागत आणि एकसरी पीक पद्धतीमुळे परागीभवनास व मधमाश्यांच्या वसाहतींना धोका निर्माण होत आहे. यासाठी उपाययोजना- वनस्पतींचे विविध संच लावणे, जे वर्षाच्या वेगवेगळ्या वेळी फुलतात; स्थानिक शेतकऱ्यांकडून कच्चा मध खरेदी करणे; शाश्वत कृषी पद्धतींमधून उत्पादने खरेदी करणे; आपल्या बागांमध्ये आणि शेतात कीटकनाशके, बुरशीनाशके किंवा तणनाशके टाळणे; जेव्हा शक्य असेल तेव्हा वन्य मधमाश्यांच्या वसाहतींचे संरक्षण करणे; मधमाशांचे पोळे प्रायोजित करणे; उन्हाळ्यात मधमाशी व पक्षांसाठी पाण्याचे भांडे बाहेर ठेवणे; वन परिसंस्था टिकवून ठेवण्यास मदत करणे; अशा प्रकारची माहिती समाजमाध्यमे आणि आंतरजालावर सामायिक करून जागरूकता वाढवणे; परागकण-अनुकूल कीटकनाशक धोरणे; परागकण अधिवासांचे संरक्षण आणि संवर्धन; इकोसिस्टम सेवांसाठी मूल्यांकन, प्रोत्साहन आणि देयके; सहभाग, ज्ञान-वाटप, आणि ग्रामीण आणि स्थानिक लोक आणि स्थानिक समुदायांचे सक्षमीकरण; जनजागृती आणि ज्ञानाची देवाणघेवाण; नैसर्गिक अधिवासाखाली काही क्षेत्र सोडणे; रासायनिक कीटकनाशकांचा वापर कमी करणे किंवा बंद करून जैविक व सेंद्रिय कीटकनाशके वापरणे; घरटी साइट सोडणे आणि शेताभोवती मधमाशी करिता पूरक पिके आणि बांधावरील वनस्पती लावणे. यामुळे धोरणात्मक स्तरावर, अधिक वैविध्यपूर्ण शेती आणि विषारी रसायनांवर कमी अवलंबित्व यामुळे परागणात वाढ होते, ज्यामुळे अन्नाची गुणवत्ता सुधारते आणि अन्नाचे प्रमाण वाढण्यास प्रोत्साहन दिले जाते.

सन 2024ची थीम- "तरुणांसोबत मधमाशी गुंतलेली" मधमाश्या आणि इतर परागकणांना तोंड देत असलेल्या आव्हानांना तोंड देण्यासाठी तरुणांची महत्त्वाची भूमिका लक्षात घेऊन, जागतिक मधमाशी दिवस 2024 हा "युवांसोबत मधमाशी संलग्न" या थीमवर लक्ष केंद्रित करतो. ही थीम मधमाशीपालन आणि परागकण संवर्धनाच्या प्रयत्नांमध्ये तरुणांना सामील करून घेण्याचे महत्त्व अधोरेखित करते, त्यांना आपल्या पर्यावरणाचे भविष्यातील कारभारी म्हणून ओळखते. या वर्षीच्या मोहिमेचा उद्देश शेती, पर्यावरणीय समतोल आणि जैवविविधता संवर्धनामध्ये मधमाश्या आणि इतर परागकणांच्या आवश्यक भूमिकेबद्दल तरुण आणि इतर भागधारकांमध्ये जागरूकता वाढवणे आहे. तरुणांना मधमाशी पालन क्रियाकलाप, शैक्षणिक उपक्रम आणि वकिली प्रयत्नांमध्ये गुंतवून, आम्ही पर्यावरणीय नेत्यांच्या नवीन पिढीला प्रेरणा देऊ शकतो आणि त्यांना जगावर सकारात्मक प्रभाव पाडण्यासाठी सक्षम करू शकतो. अधिक वैविध्यपूर्ण कृषी प्रणालींना चालना देणे आणि विषारी रसायनांवर अवलंबून राहणे कमी केल्याने परागण वाढणे सुलभ होऊ शकते. हा दृष्टीकोन अन्न गुणवत्ता आणि प्रमाण सुधारू शकतो, ज्यामुळे मानवी लोकसंख्या आणि परिसंस्थेला फायदा होतो. मधमाशांचे मूल्य- मधमाश्या आणि इतर परागकण, जसे की फुलपाखरे, वटवाघुळ आणि हमिंगबर्ड्स, मानवी क्रियाकलापांमुळे वाढत्या धोक्यात आहेत. परागकण अनेक अन्न पिकांसह अनेक वनस्पतींना पुनरुत्पादन करू देतात. परागकण केवळ अन्न सुरक्षेमध्ये थेट योगदान देत नाहीत, तर ते जैवविविधतेचे संरक्षण करण्यासाठी महत्त्वाचे आहेत - शाश्वत विकास उद्दिष्टांचा कोनशिला. ते स्थानिक परिसंस्थांच्या आरोग्याचे संकेत देणाऱ्या, आपत्कालीन पर्यावरणीय जोखमींसाठी संरक्षक म्हणूनही काम करतात. आक्रमक कीटक, कीटकनाशके, जमिनीच्या वापरातील बदल आणि मोनोपीक पद्धतीमुळे उपलब्ध पोषक घटक कमी होऊ शकतात आणि मधमाश्यांच्या वसाहतींना धोका निर्माण होऊ शकतो. मुख्य तथ्ये आणि आकडेवारी- अन्न म्हणून मानवी वापरासाठी फळे किंवा बिया तयार करणारी जगभरातील चारपैकी तीन पिके, किमान काही प्रमाणात, परागकणांवर अवलंबून असतात. जगात फुलपाखरू, पक्षी आणि वटवाघुळंसारख्या विविध परागकणांच्या प्रजाती आहेत. सर्वात लोकप्रिय मधमाश्या आहेत. पंचेवीस ते तीस हजार प्रजाती आहेत. बहुसंख्य परागकण प्रजाती जंगली आहेत, ज्यात मधमाशांच्या वीस हजारपेक्षा जास्त प्रजातींचा समावेश आहे. परागकण जगाच्या एकूण पीक उत्पादनात 35 टक्के योगदान देतात, जगभरातील 115 प्रमुख अन्न पिकांपैकी 87 परागकण करतात.

परागकण-आश्रित अन्न उत्पादने निरोगी आहार आणि पोषणासाठी योगदान देतात. परागकणांना धोका आहे, शाश्वत शेती कृषी लँडस्केपमध्ये वैविध्य आणण्यासाठी आणि अन्न उत्पादनाचा भाग म्हणून पर्यावरणीय प्रक्रियांचा वापर करून परागकणांचा धोका कमी करू शकते. मधमाशांचे रक्षण करणे जैवविविधतेचे रक्षण करते: बहुसंख्य परागकण जंगली आहेत, ज्यात मधमाशांच्या 20,000पेक्षा जास्त प्रजातींचा समावेश आहे. परागकण संकट- मधमाश्या धोक्यात आहेत. मानवी प्रभावांमुळे सध्याच्या प्रजाती नष्ट होण्याचे प्रमाण सामान्यपेक्षा शंभर ते हजार पट जास्त आहे. जवळजवळ 35 टक्के अपृष्ठवंशी परागकण, विशेषत: मधमाश्या आणि फुलपाखरे आणि सुमारे 17 टक्के पृष्ठवंशीय परागकण, जसे की वटवाघुळ, जागतिक स्तरावर नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.

!! आंतरराष्ट्रीय मधमाशी दिनाच्या समस्त मानवास हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

**- संकलन व सुलेखन -**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त**

# मुसळधार पाऊस, तरीही वराडकर महाविद्यालयात ध्वजारोहण उत्साहात



कोकण (दापोली, जिल्हा रत्नागिरी) – भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या 78व्या वर्धापन दिनानिमित्त, दिनांक 15 ऑगस्ट 2025 रोजी न.का. वराडकर कला आणि रा.वि. बेलोसे वाणिज्य कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय व शांतिलाल जैन कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय, दापोली येथे राष्ट्रध्वजारोहण समारंभ उत्साहात पार पडला.

प्राचार्य डॉ. भारत कऱ्हाड यांच्या हस्ते ध्वजारोहण केले गेले. प्राचार्यांनी उपस्थित शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी, एनसीसी कॅडेट्स तसेच इतर विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाची जय्यत तयारी करण्यात आली होती, तरीही मुसळधार पावसामुळे ध्वजारोहण पावसातच करावे लागले. एनसीसीचे विद्यार्थी पावसात भिजले, तर इतर विद्यार्थ्यांनी छत्र्या आणि रेनकोट घेऊन उभे राहून कार्यक्रमात सहभाग घेतला.

समारंभात राष्ट्रगीत गायन, महाराष्ट्र गीत आणि इतर देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण करण्यात आले. पावसामुळे काही अडथळे आले असले तरी कार्यक्रम उत्साहपूर्ण, सुसंगत आणि अनुशासित पद्धतीने पार पडला.

प्रा. सुरेश खरात यांच्या मार्गदर्शनाखाली इतिहास विभागाच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या 15 ऑगस्ट 1947 या विषयावरील भितीपत्रकाचे प्रकाशन यावेळी प्राचार्य डॉ. कऱ्हाड यांच्या हस्ते झाले झाले.

एनसीसी विभागाचे लेफ्टनंट डॉ. लक्ष्मण सीताफुले, प्रा. लक्ष्मीकांत पाटील, बिभीषण ढवळे, प्रा. गिरमकर, तसेच प्रा. स्कंधा खेडेकर यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रमाचे आयोजन उत्कृष्ट प्रकारे करण्यात आले.

# लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

## राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित हर घर अभियानांतर्गत विविध स्पर्धेचे बक्षीस वितरण



परळी वैजनाथ दि.16 (प्रतिनिधी) येथील लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात 79 व्या स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष संजय देशमुख यांच्या हस्ते तिरंगा ध्वजास वंदन करून बक्षीस वितरण करण्यात आले.

शहरातील लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात हर घर तिरंगा अभियानांतर्गत महाविद्यालयाच्या प्रांगणात तीन दिवस ध्वज वंदन करण्यात आले. बुधवारी (ता.13) संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा प्रसादजी देशमुख यांच्या हस्ते ध्वजवंदन, गुरुवारी (ता.14) संस्थेचे सचिव रवींद्रजी देशमुख यांच्या हस्ते ध्वजवंदन तर शुक्रवारी (ता.15) स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित मुख्य समारंभात संस्थेचे अध्यक्ष संजयजी देशमुख यांच्या हस्ते ध्वजास वंदन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धा, वर्ग सजावट स्पर्धेचे बक्षीस वितरण व विविध भित्तीपत्रकांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना स्मृती चिन्ह व पुष्पगुच्छ देवून गौरविण्यात आले. तसेच प्रा डॉ विद्या गुळभिले यांना पेटंट मिळाल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने शाल, पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष संजयजी देशमुख, सचिव रवींद्रजी देशमुख, कोषाध्यक्ष प्रा प्रसादजी देशमुख,संचालक श्री कांबळे, संचालिका छायाताई देशमुख, प्राचार्या डॉ विद्याताई देशपांडे यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा अरुण चव्हाण यांनी केले.

# 15 ऑगस्ट स्वातंत्र्यदिन सोहळा :मांउट लिटरा झी स्कूलमध्ये अविस्मरणीय ठरला



परळी /प्रतिनिधी येथील माऊंट लिटरा झी स्कूलमध्ये भारत सरकार आयोजित "हर घर तिरंगा" या अभियानाद्वारे तीन दिवसीय ध्वजारोहणाचा कार्यक्रम अगदी आनंद आणि हर्षोल्लसात साजरा केला गेला.

याप्रसंगी दि.13/ 8/ 2025 रोजी शाळेची प्राचार्य मंगेश काशीद सर तर दि. 14/8/ 2025 रोजी शाळेचे अध्यक्ष सुप्रसिद्ध डॉक्टर हरिश्चंद्र वंगे दादा यांच्या हस्ते तर दि.15 ऑगस्ट 2025 रोजी परळी शहरातील एक प्रतिष्ठित व्यक्तिमत्व प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. रामेश्वर बांगड यांच्या हस्ते ध्वजारोहणाचे कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

15 ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाच्या विविध कार्यक्रमाने संपूर्ण दिवस माऊंट लिटरा शाळेसाठी ऐतिहासिक क्षण ठरला. माऊंट लिटरा झी स्कूलचा पहिला स्वातंत्र्यदिनाचा सोहळा अतिशय उत्साहात व देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. सकाळी लवकरच शाळेच्या प्रांगणात विद्यार्थी, पालक व मान्यवरांच्या उपस्थितीत देशभक्ती गीतांच्या मधून संगीताने प्रत्येकाच्या चेहऱ्यावर स्वातंत्र्याचा आनंद झळकत होता.

प्रमुख पाहुणे डॉ. रामेश्वर बांगड यांनी ध्वजवंदन करून विद्यार्थ्यांना देशसेवेचे व समाजासाठी काहीतरी करण्याचे प्रेरणादायी मार्गदर्शन दिले. दुसरे प्रमुख पाहुणे श्रीराम मुंडे यांनी 79 व्या स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा देत शाळेच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच शाळेला आवश्यकतेनुसार मदत करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले उपस्थित व्यक्तिमत्व विलास मुंडे व सुरेश घुगे सर यांनी सुद्धा स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा देऊन विद्यार्थ्यांना स्वातंत्र्याचा खरा अर्थ आणि स्वातंत्र्य म्हणजे काय याविषयी मार्गदर्शन केले

या विविध कार्यक्रममध्ये विद्यार्थ्यांनी सादर केलेली भाषणे, देशभक्तीपर गीते, कविता आणि नृत्याविष्कार पाहून उपस्थित पालक व मान्यवरांच्या डोळ्यांत आनंदाश्रू दाटले होते. चिमुकल्या विद्यार्थ्यांनी केलेल्या "वंदे मातरम" च्या घोषणेमुळे संपूर्ण परिसर देशभक्तीच्या उर्जेने भारावून गेला होता.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

## पान 1 वरुन

विजयसिंह पंडित, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान यांच्यासह सर्व कार्यालय प्रमुख, अधिकारी यांची उपस्थिती होती.

यावेळी उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी भारतीय स्वातंत्र्याच्या 79 व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त राज्यातील नागरिकांना शुभेच्छा देत म्हणाले की, देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात योगदान दिलेल्या स्वातंत्र्यवीरांना, क्रांतीकारकांना, हौतात्म्य पत्करलेल्या शहिद वीरांना, अभिवादन केले आहे. असंख्य ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागातून मिळालेले स्वातंत्र्य, देशाची एकता, अखंडता, सार्वभौमता अबाधित ठेवण्यासाठी सर्वांनी वचनबद्ध होऊया, सामाजिक जाणीव, राष्ट्रीय कर्तव्य-जबाबदारीच्या भावनेतून राष्ट्रविकासात योगदान देऊया. स्वातंत्र्यदिन हा आपल्यासाठी सर्वात मोठा राष्ट्रीय उत्सव आहे. हा उत्सव तितक्याच उत्साहात, आनंदात, व्यापक स्वरुपात साजरा करायचा आहे. यंदाच्या स्वातंत्र्यदिनी आपण दृढसंकल्प करुया की, राष्ट्रविकासात सर्वांना सोबत घेऊन जाताना शेतकरी, कष्टकरी, महिला, युवक यांना प्रगतीची योग्य संधी उपलब्ध करुन द्यायची आहे. त्यांचे आर्थिक-सामाजिक सक्षमीकरण करायचे आहे. देशाचे स्वातंत्र्य, एकता, अखंडता, सार्वभौमता, लोकशाही मूल्ये अबाधित राखणे, भारतीय राज्यघटनेवरचा विश्वास अधिक दृढ करणे, ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. ती पार पाडण्यासाठी भारतमातेच्या अनेक सुपुत्रांनी आजवर सर्वोच्च त्याग केला, अमूल्य योगदान दिले. त्या सर्वांबद्दल आपण कायम कृतज्ञ असले पाहिजे. देशाचे स्वातंत्र्य, सार्वभौमत्व, लोकशाही मूल्यांच्या रक्षणासाठी आपण सर्वांनी एकजूट होऊन देशाला समृद्ध, बलशाली देश बनवण्याचा निर्धार करुया.

मराठवाड्याची भूमी ही संतांची, शूर-वीरांची, बुद्धीवंत, कर्तृत्ववानाची भूमी आहे. मराठवाड्याला सहजासहजी काही मिळालं नाही, जे काही मिळालं ते संघर्ष करुनंच मिळाले आहे. देशाला 15 ऑगस्ट, 1947 रोजी स्वातंत्र्य मिळाले, परंतू मराठवाड्याला 17 सप्टेंबर, 1948 रोजी स्वातंत्र्य मिळाले. त्यासाठी सर्वसामान्य जनतेला, निजामाच्या सैन्याशी लढावे लागले. त्या त्यागाचं स्मरण करुन, त्यांना अभिवादन करणे हे आपले कर्तव्य आहे. मराठवाडा मुक्तीसंग्रामाचे स्वामी रामानंद तीर्थ यांनी नेतृत्वं केले होते. तसेच दिगंबरराव बिंदू, गोविंदभाई श्रॉफ, रविनारायण रेड्डी, देवीसिंग चौहान, भाऊसाहेब वैशंपायन, विजयेंद्र काबरा, बाबासाहेब परांजपे यांच्यासारख्या नेत्यांनी त्यांना भक्कम साथ दिली होती. मराठवाडा मुक्तीसंग्रामात प्रत्येक गावातल्या लोकांनी सहभाग घेतला होता, हे या लढ्याचं वैशिष्ट्य होते. आपल्या बीडच्या विठ्ठलराव काटकरांनी निजामाच्या रोहिल्यांना जेरीस आणण्याचं काम केलं होतं.त्यांच्यासोबत काशिनाथ जाधव आणि हिरालाल कोटेचा हे भूमीपूत्र सुध्दा लढ्यात अग्रभागी होते.

---

निष्कासित करणे यासारखी अनेक उल्लेखनीय कामे करण्यात आली आहे. पाणंद रस्ते, शेतरस्ते मोकळे करणे अभियानातंर्गत जालना जिल्ह्यात एकुण 180 रस्ते ज्यांची लांबी 288.25 कि.मी.अतिक्रमणमुक्त करण्यात आले असून नोंद अधिकार अभिलेखात घेण्याची कार्यवाही सुरु आहे. ग्रामीण भागात स्थानिक स्वराज्य संस्था म्हणुन काम करणाऱ्या ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद यांना प्रोत्साहित करुन त्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी सन 2025-26 पासून तालूका, जिल्हा, महसूल विभाग व राज्य स्तरांवर प्रोत्साहन देण्यासाठी 'मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान' राबविण्यात येणार आहे.

जालना जिल्हा परिषदेने पर्यावरणपुरक आणि सामाजिक हितासाठी तसेच पर्यावरणाचे संवर्धन व्हावे यासाठी जिल्हा परिषद परिसर स्वच्छ व सुंदर राहावा याकरीता 'झिरो प्लास्टिक मोहिम' राबवून प्लास्टिकच्या वापरावर पूर्णपणे बंदी घातली आहे. याचप्रमाणे संपूर्ण जिल्ह्यात देखील ही मोहिम राबविण्याचे प्रशासनाचा मानस आहे. तरी या मोहिमेला नागरिकांनी सहकार्य करावे. असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

जालना जिल्ह्यातील समग्र शिक्षा योजने अंतर्गत वर्ष 2025-26 मध्ये 15 जुन रोजी शाळा सुरु होण्याच्या पहिल्याच दिवशी जिल्ह्यातील एकुण 1 लाख 38 हजार 21 विद्यार्थ्यांना मोफत गणवेशाचे वितरण करण्यात आले आहे. जिल्हा परिषद निवासी क्रीडा प्रबोधिनीतील 57 विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावर सहभाग नोंदविला आहे. त्यापैकी 13 विद्यार्थ्यांनी सुवर्ण तर 2 विद्यार्थ्यांनी रौप्य आणि 2 विद्यार्थ्यांनी कास्य राष्ट्रीयस्तरावरील पदके मिळवली आहेत. जिल्हा क्रिडा संकूलामध्ये अद्ययावत क्रिडा सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. यामध्ये अंतर्गत टेनिस कोर्ट, सिंथेटीक बास्केटबॉल, आर्टिफिशियल क्रिकेट टर्फ, सिंथेटीक स्केटींग रिंग, व्हॉलीबॉल मैदान, कबड्डी मैदान, खोखो मैदान, जिम हॉल, , संरक्षक भिंत तसेच अंतर्गत रस्ते व ड्रेनेज लाईन आदि कामे जिल्हा क्रीडा संकुल समितीकडून विकसित करण्यात आली आहेत. तर 400 मिटर सिंथेटीक ट्रॅक व नॅचरल फुटबॉल मैदानाचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या अभ्यासामध्ये स्पर्धा व सराव करण्याची वृत्ती निर्माण व्हावी या उद्देशाने जालना जिल्हाधिकारी यांच्या 'महादीप' या महत्वाकांक्षी योजनेतून श्रीहरी कोटा येथील इस्त्रो अंतराळ विज्ञान केंद्रातील संग्रहालयात जिल्ह्यातील 50 विद्यार्थ्यांची स्पर्धात्मक परिक्षा घेवून विमानाद्वारे सहल नेण्यात आली.

---

आपली अस्मिता आहे. समाजाच्या प्रेमाने आणि उत्साहाने मन आनंदून गेले अशी भावना यावेळी पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त केली.यावे□ळी पारंपरिक पामडी देवून त्यांचा सत्कार करण्यात आला.

---

विजय मुंडे, शेख इलियास, जम्मू शेठ, जि.प. सदस्य प्रदीप भैय्या मुंडे, महेश बँकेचे कार्यकारी अधिकारी उपाध्याय साहेब, बँकेचे व्यवस्थापकीय अधिकारी मानधणे साहेब, मुक्तार भाई, बबलू सय्यद,श्याम गडेकर, सगीर भाई, बद्दर भाई, यासीन भाई,प्रा.आदिनाथ नागरगोजे,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.डी.मुंडे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांरी उपस्थित होते.

---

चुरु चुरु बोलायला लागला... भावकीकडे लक्ष दिलं म्हणूनच तू आमदार झाला' असा टोला लगावला. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.यावेळी भाषण करताना आमदार रोहित पवार यांनी 40 ला रुपयांच्या निधीची घोषणा केली. ते म्हणाले की, 'पूर्वी अजित पवार माझ्याकडे लक्ष देत होते. मी अधिवेशनात पहिल्यांदा भाषण केलं होतं तेव्हा मला अजित पवारांचा फोन आला होता. भाषण चांगलं झालं पण तुझ्यावर सगळीकडून कॅमेरे असतात. जरा शर्टचे बटन लावत जा. तेव्हा त्यांचं माझ्यावर बारीक लक्ष होतं. पण आता ते गावकीचा विचार करतात पण भावकीला विसरले आहेत असं विधान केलं होतं. याला आता अजित पवार यांनी उत्तर दिलं आहे.

अजित पवार म्हणाले की,'रोहितने बरंच काही सांगितलं. मी 40 लाख देतो. चंद्रकांत दादांनी एक पूज्य वाढवावं. मी एक पूज्य वाढवावं. बरं झालं सांगितलं नाही दादा एक पूज्य वाढवतील. आमचे जयंत पाटील अजून एक पूज्य वाढवतील आणि अजितदादा अजून एक पूज्य वाढवतील. तेवढंच बाकी राहिलं होतं. फार चुरु चुरु चुरु बोलत होता. म्हटलं गाडी फार फास्ट चालली आहे.'पुढे बोलताना अजित पवार म्हणाले की, 'काहींनी बोलताना सांगितलं. दादांचं गावकीकडे लक्ष आहे. भावकीकडेही लक्ष द्या. अरे भावकीकडे लक्ष दिलं म्हणूनच तू आमदार झालास. जरा जयंतराव त्याला विचारा. किती मते पडली. पोस्टल बॅलेटमध्ये आला आपण. त्यामुळे माझ्या नादी लागू नका. तुम्ही तुमचं काम करा. मी एक अक्षर बोलणार नाही. मी महायुतीत आहे. मी कधी तुमच्यावर टीका केली. नाही. तुम्ही तुमच्या विचाराने चालला. मी माझ्या विचाराने चाललो. शेवटी आपल्याला काय करायचं. महाराष्ट्राचा विकास.'

---

कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात उपचार सुरु आहेत.मुंबई-ठाण्यामध्ये उंच दहीहंडी फोडण्यासाठी थर रचण्यात गोविंदा पथके व्यग्र असतानाच उत्सवाला गालबोट लागले. मानखुर्द परिसरात बाल गोविंदांसाठी दहीहंडी बांधणाऱ्या एका गोविंदाचा पडून मृत्यू झाला. तर ठिकठिकाणी दहीहंडी फोडण्यासाठी रचलेल्या थरांवरून कोसळून 30 जण जखमी झाले.

---

म्हणाले "प्रभू वैद्यनाथाच्या पवित्र नगरीत अनुष्ठान करता आले हे माझे भाग्य आहे. समितीच्या पदाधिकाऱ्यांनी व परळीकरांनी उत्कृष्ट नियोजन करून भक्तीचा सोहळा यशस्वी केला."

या प्रसंगी 21 दिवस अखंड अन्नदान सेवा करणाऱ्या अन्नदात्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी वैद्यनाथ बँकेच्या संचालक पदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल सौ माधुरीताई योगेश मेनकुदळे व महेशो निर्मळे व भारतीय जनता पार्टी शहराध्यक्षपदी सौ उमाताई समशेट्टी, उपाध्यक्षपदी महादेव ईटके सरचिटणीस पदी अश्विन मोगरकर, भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा परळी अध्यक्षपदी सुशील हरंगुळे यांचा सत्कार करण्यात आला व्यासपीठावर मठ संस्थानचे अध्यक्ष दत्तापाआप्पा ईटके, वैद्यनाथ देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त विजयकुमार मेनकुदळे, वैद्यनाथ बँकेच्या माजी संचालिका सुरेखा मेनकुदळे, गोदावरी चौधरी वक्रेश्वर मंदिर ट्रस्टचे विश्वस्त दयानंद स्वामी मठपती, श्याम बुद्रे, नारायणअप्पा खके, प्रकाश खोत, उल्हास ओपळे, चेतन सौंदळे, दयानंद वलांडे तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

अनुष्ठान समितीचे अध्यक्ष दयानंद चौधरी, विकास हालगे, सोमनाथ गोपनपाळे, रमेश चौंडे, नितीन समशेट्टी, चंद्रकांत उदगीरकर, रमाकांत बुरांडे, नरेश पिंपळे, शिवकुमार चौंडे, श्याम फडकरी, गिरीश संकाये, उमेश चौंडे, संदीप चौधरी, रमेश सपाटे, रामलिंग राजनाळे, रंगनाथ ईटके, महात्मा हाते, संजय कोरे, श्रीमंत तोडकरी, उमाकांत पोपडे, रोहीत हालगे, वैजनाथ ईटके, रवींद्र बुरकुले, विविध महिला कार्यकर्त्या व शेकडो भाविकांच्या उपस्थितीत सांगता सोहळा भावपूर्ण वातावरणात पार पडला. सूत्रसंचलन अशोक नावंदे सर, आभार सचिन स्वामी यांनी केले.

---

रशिया भारताला मदत करु शकतो.अमेरिका सध्या पाकिस्तानला मदत करत असली तरी भारताचे सैन्य जगात बलाढ्य सैन्य असुन सर्व प्रकारची हत्यारे, शस्त्र आहेत यामुळे पाकिस्तान भारताबरोबर युध्दाचे धाडस करणार नाही.नुकतेच भारताने पाकिस्तानमध्ये जाऊन अतिरेक्यांचा खात्मा केलेला आहे.हे युध्द तुमच्या म्हणण्यावर थांबवलेले नसुन त्यात भारताची रणनिती आहे असे सांगितले.आयपीएस झालेला विद्यार्थी व असंख्य अधिकारी बनवलेल्या आणि उच्च दर्जाचे शिक्षण देत असलेल्या संत भगवानबाबा प्राथमिक व माध्यमिक विद्यालय लिंबोटा,पांगरी,शिवाजीनगर तांडा येथील सरपंच,ग्रामपंचायत सदस्य

श्री संत भगवन बाबा विद्यालय पांगरी कॅम्प येथे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री फुलचंद कराड यांच्या हस्ते तिरंगा ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.याप्रसंगी कार्यक्रमास संस्थेच्या सचिव सौ.सुमनताई कराड,लिंबुटा गावच्या सरपंच सौ.दैवशाला बनसोडे,मा. सरपंच महादेव कराड,रवी कराड, अरुण मुंडे,इंद्रमोहन मुंडे,जयराम मुंडे,प्रकाश राठोड,रमेश चव्हाण, बाबुराव राठोड,मुख्याध्यापक श्री कोपनर सर,प्रा.मुख्याध्यापक श्री चप्पे सर,प्रवीण कराड सर गावातील गावकरी, शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.भरपावसातही विद्यार्थी विशेषतः मुलींची संख्या लक्षणीय होती.

---

## पान 4 वरुन

शाळेची आकर्षक सजावट करण्यात आली होती. तसेच भाषण स्पर्धा आयोजित करण्यात आली होती .त्यामध्ये अनेक विद्यार्थ्यांनी मराठी,हिंदी व इंग्रजी भाषेत क्रांतिकारकांचे कार्य, स्वातंत्र्याचा खरा अर्थ व देशभक्ती काय असते हे सांगितले. देशभक्तीपर गीतांनी सर्व वातावरण प्रफुल्लित झाले होते.

सचिव दीपक तांदळे यांनी प्रेरणादायी मनोगत व्यक्त केले ते म्हणाले,"आजचा दिवस हा आपल्या प्रत्येक भारतीयाच्या हृदयात विशेष स्थान बाळगणारा दिवस आहे. 15 ऑगस्ट 1947 – हा तो सुवर्णक्षण, जेव्हा आपला भारत परकीय सत्तेच्या बेड्यांतून मुक्त झाला आणि आपण स्वराज्याच्या दिशेने पहिले पाऊल टाकले.मित्रांनो, हे स्वातंत्र्य आपल्याला सहज मिळाले नाही. महात्मा गांधींचे सत्याग्रह, लोकमान्य टिळकांचे स्वराज्याचे घोषवाक्य, नेताजींचा 'तुम मुझे खून दो, मैं तुम्हें आज़ादी दूंगा' हा जोश, भगतसिंग-राजगुरु-सुखदेव यांचे बलिदान... या सर्वांनी आपल्याला स्वातंत्र्याचा अमूल्य ठेवा दिला. हजारो नावं इतिहासात नोंदली गेली, पण लाखो बलिदानांची नावे कोणालाही माहीत नाहीत; तरीही त्यांनी आपल्यासाठी प्राणांची आहुती दिली. आज आपण स्वतंत्र आहोत.आपले विचार, आपला धर्म, आपली भाषा, आपले शिक्षण... पण खरी जबाबदारी आता आपल्या खांद्यावर आहे. स्वातंत्र्य टिकवून ठेवणे,देशाच्या प्रगतीत हातभार लावणे,समाजात ऐक्य, बंधुता आणि प्रेम वाढवणे,पर्यावरणाचे संरक्षण करणे आणि नवा, समृद्ध, सुशिक्षित भारत घडवणे.विद्यार्थ्यांनो, तुम्हीच उद्याचे नेते, वैज्ञानिक, शिक्षक आणि देशसेवक आहात. तुम्ही शिकाल, घडाल, मेहनत कराल, तेव्हाच स्वातंत्र्याचा खरा अर्थ पूर्ण होईल.आजच्या दिवशी आपण सर्वांनी एक संकल्प करूया.मी माझ्या देशाचा सन्मान वाढवीन, कर्तव्य पार पाडीन आणि भारताला जगात सर्वोच्च स्थानी नेण्यासाठी माझे संपूर्ण योगदान देईन. आपला तिरंगा सदैव अभिमानाने फडकत राहो, प्रत्येक भारतीय हृदयात देशभक्तीची ज्योत प्रज्वलित राहो, आणि "जय हिंद" चा घोष सदैव आकाशात दुमदुमत राहो."

सर्व उपस्थित विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते खाऊ वाटप करण्यात आले व देशभक्तीपर नारे देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. फाजगे सर तर आभार श्री. कोगुरवार सर यांनी मानले यावेळी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी आदींची उपस्थिती होती.

---

चारचाकी वाहनाचे पुढील चाक गेल्याने अपघात झाला. यात गाडीचे नुकसान झाले मात्र सुदैवाने चालकाला कुठलीही दुखापत झाली नाही. यापूर्वीही अनेक नागरिक व वाहने या उघड्या खड्ड्यात पडली आहेत. नगरपरिषदेकडे या भागातील व्यापाऱ्यांनी अनेक वेळा सांगूनही हा खड्डा बंद केला नाही.

गणेशपार येथील मुख्य चौकातील नाली दीड महिन्यांपूर्वी खोदून ठेवलेली आहे. याबाबतीत नगरपरिषद प्रशासनाकडे अश्विन मोगरकर यांनी तक्रार केल्यानंतर नप अधिकाऱ्यांनी याची पाहणी केली व दोन तीन दिवसात नालीचे बांधकाम करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र दीड महिना उलटूनही काम केले गेले नाही. मुख्य चौकातील वळणावरच नाली खोदून ठेवल्याने अनेक वेळा वृद्ध नागरिक, लहान मुले यात पडली आहेत. वारंवार सांगूनही या नालीचे बांधकाम केले गेले नाही.

शहरात अनेक ठिकाणी पडलेले खड्डे, उघड्या नाल्या बुजवायचे सोडून बंद अवस्थेत असलेल्या अंबेवेस येथील शॉपिंग कॉम्प्लेक्स समोर पेव्हर ब्लॉक बसवले जात आहेत. नागरिकांनी कररूपी दिलेल्या पैशातून सुविधा देण्याचे काम नगरपरिषदेचे आहे. मात्र अनवश्यक कामे करून आवश्यक कामाकडे कानाडोळा करून आंधळा कारभार केला जात असल्याचा आरोप भाजपा सरचिटणीस अश्विन मोगरकर यांनी केला आहे.

---

सदर कार्यक्रम दोन सत्रात घेण्यात आला. पहिल्या सत्रात 5वी वर्गाचा पालक मेळावा व दुसऱ्या सत्रात 6 वी ते 8वी वर्गाचा पालक मेळावा घेण्यात आला.

सदरील दोन्ही कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक श्री.कदरकर सर अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून पर्यवेक्षक श्री.महादेव धायगुडे सर, जेष्ठ सहशिक्षक श्री.बालासाहेब राठोड सर, आचार्य सर, बीडकर सर, पठाण सर,श्रीमती बनसोडे मॅडम,श्रीमती पवार मॅडम, श्री. भोसले सर, भोसले मॅडम श्री.समिंदरसवळे सर व पालक बद्दर भाई ई. मान्यवर मंचावर उपस्थित होते. पहिल्या सत्रात 5वी वर्गात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांचा मेळावा स्वतंत्रपणे घेण्यात आला. त्याचे यशस्वीपणे संचालन श्रीमती बनसोडे मॅडम यांनी केले. प्रास्ताविक भाषण श्रीमती पी.एम.पवार मॅडम यांनी केले.

दुसऱ्या सत्रात 6वी ते 8वी वर्गात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांचा सुसंवाद मेळावा घेण्यात आला. दोन्ही सत्रात घेण्यात आलेल्या या पालक मेळाव्यास पालकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

दुसऱ्या सत्रात प्रास्ताविक श्री.सचिन बीडकर सर यांनी केले. आपल्या प्रास्ताविकात शाळेत घेण्यात येत असलेल्या शालेय व सहशालेयउपक्रमांची माहितीउपस्थितांस दिली.विषय शिक्षक म्हणून सहशिक्षक शौकत पठाण सर व अंकुश आचार्य सर यांनी पालकांच्या सूचनांची नोंद घेत विद्यार्थ्यांच्या भाषा विषयांसह इतर सर्व विषयांबाबत शाळेत राबविण्यात येत असलेल्या व पुढील सत्रात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. यानंतर उपस्थित पालकांनी काही चांगल्या सुचना केल्या. त्यांच्या सुचनांचे निरसन पर्यवेक्षक श्री.महादेव धायगुडे सर यांनी केले.पालकांनी आपल्या आपेक्षा व सुचना व्यक्त केल्यानंतर अध्यक्षीय समारोप शाळेचे मुख्याध्यापक श्री. भाऊसाहेब कदरकर सर यांनी केले. आपल्या अध्यक्षीय समारोपात पालकांनी केलेल्या चांगल्या सुचनांची नोंद मुख्याध्यापक म्हणून मी घेतली आहे व त्यांची अंमलबजावणी लगेचच करण्यात येईल अशी ग्वाही त्यांनी याप्रसंगी उपस्थित पालकांना दिली.5 वी वर्गाच्या पालक मेळाव्यास पालकांचा चांगला प्रतिसाद मिळाल्याने शाळेचे मुख्याध्यापक श्री.कदरकर सर व प्राचार्य श्री.व्ही. एन.शिंदेसर सर यांनी वर्ग शिक्षिका पवार मॅडम यांच्या कार्याचे कौतुक केले. 6वी ते 8वी वर्गाच्या दुसऱ्या सत्रात घेण्यात आलेल्या पालक मेळाव्याचे संचालन 8वी वर्गाच्या सहशिक्षिका श्रीमती सुनिता कोम्मावार मॅडम यांनी केले. पाउस चालू असूनही मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या पालकांचे आभार संस्कृत विषय सहशिक्षक श्री. नितीन व्हावळे सर यांनी मानले.

---

आणि उत्तर प्रदेशमध्ये जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.महाराष्ट्राला पावसानं झोडपून काढलं आहे, गेल्या दोन दिवसांपासून राज्यभरात मुसळधार पाऊस सुरु असून, नदी नाल्याला पूर आला आहे. दरम्यान हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार पुढील चार ते पाच दिवस राज्यामध्ये अशीच परिस्थिती राहणार आहे, हवामान विभागाच्या या नव्या इशाऱ्यामुळे चिंता वाढली आहे. हवामान विभागाकडून महाराष्ट्रात अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. कोकण आणि विदर्भात जोरदार पावसाची शक्यता आहे, तसेच पश्चिम महाराष्ट्रात देखील पावसाचा जोर वाढू शकतो असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.दरम्यान राज्यात शुक्रवारी रात्रीपासूनच जोरदार पाऊस सुरु आहे. आज राज्यातील अनेक जिल्ह्यांना हाय अलर्ट देण्यात आला आहे. हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार कोकणातील रायगड जिल्ह्याला पावसाचा रेड अलर्ट आहे, तर मुंबई, पालघर, नवी मुंबई आणि ठाणे या जिल्ह्यांना पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.दुसरीकडे आज पश्चिम महाराष्ट्रात देखील मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला असून, पुणे, कोल्हापूर, सातारा आणि सांगली या जिल्ह्यांमध्ये मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यता आहे, तर पश्चिम महाराष्ट्रातील घाट माथ्यावर अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, नांदेड आणि हिंगोली या जिल्ह्यांना मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

---

स्वभावगुण असलेले यशराज पंडित हे गेवराई तालुक्यातील शहरासह ग्रामीण भागातल्या प्रत्येक कुटुंबाच्या सुखदुःखाच्या प्रसंगी आवर्जून उपस्थित राहून आपलेपणाने राहतात. त्यामुळे त्यांच्याविषयी गाव, वाडी, वस्ती, तांड्यावरील लोकांमध्ये मोठा विश्वास निर्माण झालेला आहे. 16 ऑगस्ट रोजी यशराज पंडित यांचा वाढदिवस असल्याने दिवसभर माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या निवासस्थानी ग्रामीण भागातून आपापल्या गाड्यांमधून येत तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित झाला होता. प्रत्येकानेच आपल्या लाडक्या युवा नेत्याचे शाल, श्रीफळ व फेटे बांधून सत्कार करत केक व पेढा भरुन त्यांचे तोंड गोड केले. यावेळी बोलताना यशराज पंडित म्हणाले की, सर्व मित्र परिवाराला एकत्र आणण्यासाठी माझा वाढदिवस हे एक कारण आहे. परंतु माझ्या सर्व मित्रांना एकत्रित पाहण्याचा योग आणि बोलण्याची संधी मला या वाढदिवसानिमित्त मिळाली यात मी माझे समाधान मानतो. बदामराव आबांनी ज्याप्रमाणे सर्व जाती धर्मांना सोबत घेऊन प्रत्येकाच्या अडीअडचणी समजून घेतल्या आणि कुटुंबाप्रमाणे त्यांना साथ दिली. अगदी त्याचप्रमाणे मीही या पुढील काळात प्रत्येक कुटुंबासोबत त्यांच्या घरातला मुलगा म्हणून राहण्याचे भाग्य मिळवणार आहे आणि तो अधिकार गेवराई कर मला देतील असा मला विश्वास असल्याचे ते म्हणाले.

यावेळी दिवसभरात गेवराई विधानसभा मतदारसंघासह बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य, सरपंच, चेअरमन, पत्रकार, विविध सामाजिक संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, पदाधिकारी आणि विशेषतः वडीलधारी मंडळी व तरुण मित्रांनी बदामराव पंडित यांच्या निवासस्थानी तोबा गर्दी केली होती.

---

जन्मोत्सव राज्यात मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे.यानिमीत्त परळी नगरपरिषदेच्या वतीने व वारकरी मंडळाच्या वतीने शुक्रवार दि.15 ऑगस्ट रोजी दुपारी 1 वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथुन परळी शहर व परिसरातील असंख्य महिला भजनी मंडळ, हजारो वारकरी व संत,महंतांच्या उपस्थितीत पालखी सोहळा काढण्यात येणार आहे. शिवाजी चौक बस्थानक,अग्रवाल लॉज,मोंढा मार्केट, राणी लक्ष्मीबाई टॉवर मार्गे लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंग मंदिर येथे समारोप झाल्यानंतर सामुहिक पसायदान व हरिपाठ घेण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अ.भा.वारकरी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प.प्रकाश महाराज बोधले हे रहाणार असुन प्रमुख उपस्थिती ह.भ.प.तुकाराम महाराज मुंडे शास्त्री,ह.भ.प.वासुदेवानंद महाराज बैरागी,ह.भ.प.भरत महाराज गुट्टे.ह.भ.प.विश्वंभर महाराज उखळीकर,गोविंद महाराज मुंडे, बाळासाहेब महाराज लटपटे,जगदीश महाराज सोनवणे,विजयानंद महाराज आघाव,पंडित महाराज गिरी,अर्जुन महाराज शास्त्री,बंडोपंत महाराज ढाकणे,भरत महाराज सोडगीर आदींची प्रमुख उपस्थिती रहाणार आहे.या पालखी सोहळ्यास व सामुहिक पसायदान,हरिपाठ कार्यक्रमास परळी व परिसरातील भाविकांनी सहभागी होवुन महाराष्ट्राची वारकरी सांप्रदायाची परंपरा जोपासावी असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

---

वाखाणण्याजोगे होते. शाळेतर्फे उपस्थित सर्व मान्यवरांचा यथोचित सत्कार करुन सांस्कृतिक कार्यक्रमास सुरुवात झाली. यामध्ये शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध देशभक्तीपर समूहगीतांचे, समूहनृत्यांचे उत्कृष्ट सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.

याप्रसंगी मा.श्री.श्रीकांत पाटील सर यांनी आपल्या मनोगतातून स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या क्रांतिकारकांची शौर्यगाथा सांगितली व विद्यार्थ्यांच्या मनामध्ये देशभक्तीची भावना वाढीस लागावी यासाठी मार्गदर्शन केले.

त्यानंतर शाळेतील विद्यार्थी चि. अरिहंत कळस्कर, आदित्य डिकले,कु.कुंजल शिंदे व संस्कृती राठोड यांनी आपल्या भाषणाच्या माध्यमातून भारतीय स्वातंत्र्यलढ्याबद्दल अमूल्य माहिती दिली. तसेच इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये योगदान देणाऱ्या विविध व्यक्तिमत्वांच्या वेशभूषा स्पर्धेमध्ये उत्कृष्ट प्रतिसाद दिला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.अनुष्का बनसोडे, प्रणाली गव्हाणे, आकांक्षा गुट्टे व चि.अमरनाथ कराड या विद्यार्थ्यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री.आनंद काटपुरे सर यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे सांस्कृतिक विभाग प्रमुख नसीर अहमद सर व सर्वच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. सदरील कार्यक्रमास स्वामी विवेकानंद युथ वेल्फेअर सोसायटीच्या अध्यक्षा सौ.उषा किरण गित्ते मॅडम ,शाळेचे मार्गदर्शक व प्रेरणास्त्रोत मा.श्री.किरण गित्ते साहेब (सचिव, नगरविकास, सार्वजनिक बांधकाम,आरोग्य, पर्यटन, उद्योग विभाग त्रिपुरा सरकार) व शाळेचे प्राचार्य मा.श्री.श्रीकांत पाटील सर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

---

आणि निष्क्रिय आहे. त्यामुळे विजयादशमीसारख्या महत्वाच्या धार्मिक सोहळ्यापूर्वी हा पूल वापरासाठी उपलब्ध होईल की नाही याबाबत शंका निर्माण झाली आहे. यासंदर्भात परळी नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांच्याशी कामाच्या संदर्भात चर्चा करुन माहिती घेतली

सामाजिक कार्यकर्ते ॲड. मनोज संकाये यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे प्रशासनाला धारेवर धरत "हा पूल विजयादशमीपूर्वी पूर्ण करावा अन्यथा तीव्र आंदोलन उभारले जाईल" असा इशारा दिला आहे. त्यांनी स्पष्ट केले की, भाविकांच्या सुरक्षेशी व धार्मिक परंपरेशी खेळ चालणार नाही.

ॲड. संकाये म्हणाले, "प्रभू वैद्यनाथ व देवी कालरात्रीच्या पालखी मार्गातील काम तातडीने पूर्ण होणे अत्यावश्यक आहे. अन्यथा प्रशासनाच्या दिरंगाईला जबाबदार धरुन आम्ही रस्त्यावर उतरू. धार्मिक भावना दुखावल्या गेल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा ॲड मनोज संकाये यांनी दिला आहे.

---

कंत्राटदाराच्या मनमानीला लगाम घालण्याचे निर्देश दिले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की भारताच्या 79 व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त बीडला राज्याचे अर्थ, नियोजन व बीड जिल्हा पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते शासकीय ध्वजारोहण कार्यक्रम 15 ऑगस्ट रोजी संपन्न झाल्यानंतर संघटनेच्या वतीने निवेदन सादर करण्यात आले. एका बाजूला आपण मोठ्या थाटात स्वातंत्र्य दिन साजरा करत आहोत आणि दुसऱ्या बाजूला या जिल्ह्यातील कष्टकरी कंत्राटी कामगारांना त्यांच्या किमान वेतनासाठी व इतर मूलभूत हक्क मिळवून घेण्यासाठी सातत्याने संघर्ष करावा लागतो ही अत्यंत लाजिरवाणी गोष्ट आहे.

कंत्राटदाराकडून केवळ वेतनाच्या सुमारे 30 ते 40 टक्के रक्कम दिली जाते. उर्वरित रक्कम कंत्राटदाराकडेच राहत असल्याने कंत्राटी कामगारांचे मागील अनेक वर्षापासून आर्थिक शोषण होत आहे. कंत्राटदार हे सत्ताधाऱ्यांच्या पक्षातील कार्यकर्ते असल्यामुळे त्यांच्यावर कोणीही कारवाई करत नाहीत. राजकीय वरदहस्त असल्यामुळे या कटात जिल्ह्यातील सर्व संबंधित अधिकारी सुद्धा समाविष्ट असल्यामुळे " तेरी भी चूप " " मेरी भी चूप " असा प्रकार वर्षानुवर्षे सुरु आहे. कंत्राटदारांनी कंत्राटी कामगारांच्या जीवावर कोट्यावधी रुपये कमावले. एका कामगारांच्या एक हजार रुपये नफा देखील ग्राह्य धरला असता, पण प्रत्यक्षात एका कामगारावर जवळपास 10 ते 12 हजार रुपये कंत्राटदार / ठेकेदार वसूल करत असल्याचा आरोप आहे. ही परिस्थिती अत्यंत संताप जनक असल्याचे कामगारांनी सांगितले.

यापूर्वी जिल्हाधिकारी, जिल्हा प्रशासनाधिकारी / जिल्हा सह आयुक्त नगरपरिषद प्रशासन विभाग जिल्हाधिकारी कार्यालय बीड, जिल्ह्यातील सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत व मुख्य अभियंता औष्णिक विद्युत केंद्र परळी वैजनाथ यांना देखील या अन्यायाची पूर्ण जाणीव होती. मात्र त्यांनी कोणतेही ठोस पाऊल उचलले नाही, त्यामुळे कामगारांमध्ये नाराजी आणि असंतोष वाढत गेला आहे. या पार्श्वभूमीवर आपण " बीड जिल्हा पालकमंत्री पद स्वीकारल्यापासून सकारात्मक आणि ठाम भूमिका घेतली आहे. ही जबाबदारी अत्यंत उत्तम पद्धतीने पार पाडताल याबाबत आम्हाला शंका नाही. असे कंत्राटी कामगारांना व संघटनेला विश्वास आहे.

तेव्हा आपणास विनंती आहे की सदरिल प्रकरणाचा निपटारा करण्यासाठी आपल्या अध्यक्षतेखाली एक आढावा बैठक घेऊन जिल्ह्यातील कंत्राटी कामगारांना त्यांचे मूलभूत हक्क मिळवून देण्यास सहकार्य करून संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश द्यावेत अशी विनंती सदरील निवेदनाद्वारे केली आहे. शिष्टमंडळात रोजंदारी मजदुर सेनेचे केंद्रीय महासचिव भाई गौतम आगळे सर, मराठवाडा अध्यक्ष भाई राजेश कुमार जोगदंड, महासचिव भाई उध्दव खाडे, जिल्हाध्यक्षा अनिता बचुटे, जिल्हा सचिव बबीता तांगडे सहभागी झाले होते. अशी माहिती संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष भाई राजेश कुमार जोगदंड यांनी एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.

---

बियाण्याचा साठा अनधिकृत व्यक्तीतून वापरला जाण्याचा धोका पूर्णपणे टाळता येतो . डिवाइसच्या आत नियंत्रित तापमान आणि आर्द्रता राखली जाते त्यामुळे बियाण्यांची गुणवत्ता वर्षानुवर्षे तशीच टिकून राहाते . प्रा .डॉ.अमोल पाटील, प्रा. डॉ. प्रकाश देशमुख , प्रा. डॉ . उत्तम साळवे, प्रा. डॉ . बापू सरवदे प्रा . डॉ . मिलिंद जमदाडे इत्यादी प्राध्यापकांचा यामध्ये सहभाग होता .

प्रोफेसर डॉ . विद्या गुळभिले यांना पेटंट प्राप्त झाल्यामुळे स्वांतंत्र्य दिनानिमित्त महाविद्यालयातर्फे मा . प्राचार्या डॉ. विद्या देशपांडे मॅडम यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला .यावेळी संस्थेच्या संचालिका मा.छायाताई देशमुख, संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा प्रसाद देशमुख, सदस्य मा.कांबळे सर आणि सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते .

---

बळीराम उपाडे , प्रा राहुल सुरवसे , बलभीम बनसोडे , शाहीर गौतम सरवदे व शाहीर महादेव भालेराव यांनी आपल्या गीत गायनातून दादांना अभिवादन केले.

विचार अभिवादन कार्यक्रमात डॉ.किर्तीराज लोणारे यांनी प्रसंगोचीत विचार मांडले. अध्यक्षीय समरोपात ॲड.शाम तांगडे म्हणले की खऱ्या मराठी साहित्याला अभासी जगातून वास्तवात आणणारे व त्याला लोकांचे साहित्य करणारे दोनच साहित्यीक आहेत. ते म्हणजे लोककवी वामनदादा कर्डक व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे होय ! म्हणून हेच खरे मराठी साहित्याचे जनक आहेत. असे ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा.डॉ.गणेश सुर्यवंशी यांनी केले. तर संजय हतागळे यांनी आभार मानले.

या प्रसंगी विश्वनाथ सावंत , सुभाष घाडगे , नरसिंग तरकसे , मिलींद कांबळे , चंद्रमणी गोवंदे , भारत सातपुते , बाळासाहेब खांडके , वसंत वाघमारे , विनोद दहीरे , अन्विश दहीरे , भारत दासूद , आयुष दासूद , राजरत्न सरवदे तसेच सुलोचनाताई घोडके , विशाखा दहीरे आदींची उपस्थिती होती.

---

हॅलो बीड
परळी संघर्षनेता
रविवार दि. 17 ऑगस्ट 2025


## भगवानगड हे केवळ धार्मिक स्थळ नसून अध्यात्म, संस्कार आणि संत परंपरेच्या जतनाचे एक महत्त्वाचे प्रेरणास्थान आहे - सभापती प्रा. राम शिंदे



भगवानगड / प्रतिनिधी अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव दौऱ्यावर असताना विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी आवर्जून श्री क्षेत्र भगवानगड येथे भेट देऊन ऐश्वर्यसंपन्न संत भगवानबाबांच्या समाधीचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी गडाचे मठाधिपती, ह.भ.प. श्रीगुरु न्यायाचार्य डॉ. नामदेव महाराज शास्त्री बाबा यांची भेट घेऊन त्यांचेही आशीर्वाद घेतले.

यावेळी महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ. नामदेव महाराज शास्त्री बाबांच्या समवेत त्यांनी श्री क्षेत्र भगवानगड परिसराची आणि श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या प्रगतीपथावर असलेल्या भव्य मंदिर कामाची देखील त्यांनी पाहणी केली. हे मंदिर वारकरी संप्रदायाच्या अखंड परंपरेचे प्रतीक असून, भक्तांसाठी हे केंद्र भविष्यात आणखी भव्य व प्रेरणादायी ठरणार आहे असे भावोद्गार त्यांनी काढले. श्री क्षेत्र भगवानगड हे केवळ धार्मिक स्थळ नसून अध्यात्म, संस्कार आणि संत परंपरेच्या जतनाचे एक महत्त्वाचे प्रेरणास्थान आहे. या पवित्र स्थळी आल्यानंतर अध्यात्मिक ऊर्जा, शांतता आणि भक्तिभाव यांचा सुंदर अनुभव मिळाला असेही सभापती प्रा. राम शिंदे यांनी सांगितले. यावेळी श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टच्या वतीने सभापती प्रा. राम शिंदे साहेबांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

## आपल्या कर्तव्य, प्रामाणिकपणा आणि समर्पणातच खरी देशसेवा आहे - श्री. दीपक तांदळे

### ➲ संस्कार प्राथमिक शाळा विद्यानगर विभागात देशसेवेच्या संकल्पांसह स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा





परळी (प्रतिनिधी) - शहरातील श्री पद्मावती शिक्षण संस्था संचलित, संस्कार प्राथमिक शाळा,विद्यानगर विभागात स्वातंत्र्य दिन उत्साहात व आनंदात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. कैलास तांदळे (अध्यक्ष, श्री पद्मावती शिक्षण संस्था) प्रमुख पाहुणे श्री. दीपक तांदळे (सचिव, श्री पद्मावती शिक्षण संस्था) श्री.अनकाडे सर (मुख्यकार्यकारी अधिकारी, श्री पद्मावती शिक्षण संस्था) तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.माधुरीताई तांदळे मॅडम आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते क्रांतिकारकांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर राष्ट्रगीत, राज्यगीत, प्रतिज्ञा, ध्वजगीत, समूहगीत सादर करण्यात आले.स्वातंत्र्यादिना निमित्त पान 3 वर

## शहरातील उघड्या गटारी, खड्ड्यामुळे अपघात, नगरपरिषदेने त्वरित खड्डे बुजवून घ्यावेत ; अश्विन मोगरकर





परळी वैजनाथ

मोंढा मार्केट येथे उघड्या व्हॉल्व्ह च्या खड्ड्यात चारचाकी गाडीचे चाक फसल्याने परळी नगरपरिषदेचा भोंगळ कारभार उघडा पडला आहे. गणेशपार येथील नालीही मागील दीड महिन्यांपासून खोदून ठेवल्याने अपघाताची शक्यता आहे. परळी नगरपरिषदेकडून आवश्यक कामाकडे कानाडोळा केला जात असल्याचा आरोप भाजपा सरचिटणीस अश्विन मोगरकर यांनी केला आहे.

परळी शहरात कोट्यवधींचा निधी विकासकामांसाठी आला आहे. रस्ते, नाली, भूमिगत गटार अश्या विविध विकास कामामुळे नागरिकांना सुविधा उपलब्ध करण्याऐवजी नगरपरिषदेच्या आंधळ्या कारभाराचा फटका मात्र नागरिकांना बसत आहे. शनिवार, दि 16 ऑगस्ट रोजी सकाळी मोंढा मार्केट मधील टेलर लाईन जवळ उघड्या स्थितीत असलेल्या व्हॉल्व्ह च्या खड्ड्यात पान 3 वर

## नाथ शिक्षण संस्थेचे सहसचिव श्री.प्रदीपजी खाडेसाहेब यांच्या संकल्पनेतून मिलिंद विद्यालयात पालक मेळावा संपन्न



दि.15 ऑगस्ट 25,(प्रतिनिधी): परळी वै येथील नाथ शिक्षण संस्था संचलित मिलिंद माध्यमिक विद्यालयात इयत्ता 5 वी ते 8 वी वर्गाचा पालक मेळावा यशस्वीरीत्या संपन्न झाला.

संस्थेचे सहसचिव श्री. प्रदीपजी खाडे साहेब यांनी नुकतीच शाळेस धावती भेट देऊन विद्यार्थी, शिक्षक व शालेय प्रशासनाला मार्गदर्शन व काही सुचना केल्या होत्या. त्याचाच एक भाग म्हणून आज दि.15 ऑगस्ट 2025 रोजी मिलिंद माध्यमिक विद्यालयात इयत्ता 5 वी ते 8वी वर्गात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांशी सुसंवाद साधण्यासाठी पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.

चालु शैक्षणिक वर्षात नव्यानेच मिलिंद माध्यमिक विद्यालयात 5वी वर्गात प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांशी; त्यांच्या पाल्यांच्या शैक्षणिक प्रगती बाबत तसेच त्यांच्या शैक्षणिक समस्या व सुचना यांबाबत साधक बाधक चर्चा घडवून आणण्यासाठी 5वी वर्गाच्या वर्ग शिक्षिका श्रीमती पवार प्रिती मनोहर मॅडम यांनी विशेष परिश्रम घेतले. पान 3 वर

## महाराष्ट्रावर आता नवं संकट, या जिल्ह्यांना हाय अलर्ट, आयएमडीचा हादरवणारा अंदाज



हवामान विभागाकडून देशातील अनेक राज्यांमध्ये अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्यामुळे पुढील सात दिवस देशभरात अतिवृष्टीचा अंदाज आहे. वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर नागरिकांना सतर्कतेचं आवाहन करण्यात आलं आहे.हवामान विभागाकडून देण्यात आलेल्या इशाऱ्यानुसार पुढील सात दिवस गोवा, महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. तर 20 ते 22 ऑगस्टदरम्यान बिहारमध्ये अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. 19, 21 आणि 22 ऑगस्ट रोजी झारखंडमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज आहे. हवामान विभागाकडून पुढील पाच दिवस झारखंड, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, ओडिशा, छत्तीसगड, सिक्कीम, उत्तराखडं, तेलंगणा, आंध्र प्रदेश पान 3 वर

## बदामराव पंडितांचा बंगला कार्यकर्त्यांनी फुलला

### ➲ सहारा अनाथालयात विद्यार्थ्यांसोबत स्नेहभोजन



गेवराई / प्रतिनिधी स्पष्टवक्तेपणा आणि मनमिळाऊ स्वभाव आणि सकारात्मक दृष्टिकोन यामुळे प्रत्येक युवकांना आपला मित्र वाटणारे युवा नेते यशराज पंडित यांचा दिनांक 16 ऑगस्ट रोजी वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वाढदिवसानिमित्त माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांचा बंगला युवा कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणावर फुलल्याचे चित्र पाहायला मिळाले.

माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांचे चिरंजीव युवा नेते यशराज पंडित यांचा 16 ऑगस्ट रोजी वाढदिवस गेवराई तालुक्यात विविध उपक्रमांनी युवकांनी उत्साहात साजरा केला. कमी वयात तरुण मित्रांची मोठी फळी आणि तीही जीवाला जीव देणारी निर्माण करण्याचे काम यशराज पंडित यांनी तालुकाभरात केले आहे. प्रत्येकाच्या अडीअडचणीला धावून जाणारा आणि वेळप्रसंगी स्वतःचाही जीव धोक्यात घालणारा जीवाभावाचा मित्र म्हणून यशराज पंडित यांच्याकडे गेवराई तालुक्यातील प्रत्येक गावचा युवक पाहतो. वडील बदामराव पंडित यांच्याप्रमाणेच पान 3 वर

## नगर परिषद परळी वै. व अखिल भारतीय वारकरी मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने

### » संत ज्ञानेश्वर महाराज सुवर्णमहोत्सवी जन्मोत्सवानिमीत्त आज परळीत हरिपाठ, सामुहिक पसायदान व पालखी सोहळा








परळी (प्रतिनिधी) संत ज्ञानेश्वर महाराज यांचा यावर्षी 750 वा सुवर्ण महोत्सवी जन्मोत्सव असुन या निमित्त परळी नगरपरिषदेच्या वतीने व अखिल भारतीय वारकरी मंडळ व राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे ताईसाहेब व माजीमंत्री आ.धनंजय मुंडे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवार दि.15 ऑगस्ट रोजी परळीत सामुहिक पसायदान व हरिपाठ आणि भव्य पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.या सोहळ्यात परळी व परिसरातील वारकरी ,भाविक व नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन संयोजक न.प.मुख्याधिकारी त्र्यंबक कांबळे व ह भ प रामेश्वर महाराज कोकाटे अखिल भारतीय वारकरी मंडळ यांनी केले आहे.

श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांचा सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी पान 3 वर

## अनुसयादेवी कालिके यांचे दु :खत निधन



बीड (प्रतिनिधी) : बीड येथील रहिवासी असलेल्या कालिके कुटुंबातील ज्येष्ठ सदस्य श्रीमती अनुसयादेवी कुंदनप्रसाद कालिके (हंसीबाई) यांचे आज दिनांक 16.08.2025 रोजी दुपारी 3.20 वाजता दुःखद निधन झाले त्यांचा स्वभाव अंत्यत मनमिळाऊ होता. त्यांच्या पश्चात मुलगा,मुली, सुन, नांतवडे असा भरगच्च परिवार आहे. त्यांचा अंत्यविधी आज सकाळी 11.00 वाजता त्यांच्या वैयक्तिक निवासस्थान साळ गल्ली येथून मोंढा अमरधाम येथे होणार आहे.

## दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूलमध्ये 79 वा भारतीय स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा



परळी, (प्रतिनिधी)

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूलमध्ये 79 वा भारतीय स्वातंत्र्य दिन खूप जल्लोषात साजरा करण्यात आला. या प्रसंगी शाळेचे प्राचार्य मा.श्री.श्रीकांत पाटील सर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून डी. डब्ल्यू.पी.एस. वंडरलँडच्या प्राचार्या कु. स्वप्राली टाले मॅडम यांची उपस्थिती लाभली होती.ध्वजारोहणानंतर भारतीय तिरंग्याला मानवंदना देण्यासाठी शाळेतील विद्यार्थी परिषदेतील विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध पद्धतीने परेडचे सादरीकरण केले.यावेळी त्यांची शिस्त व नेतृत्व कौशल्य पान 3 वर

## घनशी नदीवरील पुलाचे काम विजयादशमी पूर्वी पूर्ण करा- ॲड.मनोज. संकाये

### अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा!





परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :परळी वैजनाथ शहरातील डोंगर तुकाई देवी मार्गावरील बट भैरव मंदिराजवळील घनशी नदीवरील पुलाचे काम अद्यापही अपूर्णच आहे. विशेष म्हणजे देशातील पाचवे ज्योतिर्लिंग प्रभू श्री वैद्यनाथ व श्री कालरात्री देवीची पालखी विजयादशमीच्या दिवशी पारंपरिक मार्गाने बट भैरव येथून वैद्यनाथ मंदिरात प्रस्थान करते. मात्र अद्यापही हा पूल पूर्ण न झाल्याने भाविकांच्या श्रद्धेचा व सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला असून या पुलाचे काम विजयादशमी पूर्वी पूर्ण करावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते ॲड मनोज संकाये यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे

याबाबत सविस्तर वृत्त असे की, या पुलाचे काम मागील अनेक दिवसांपासून सुरु असूनही कामाचा वेग संथ पान 3 वर

## जिल्ह्यातील कंत्राटी कामगारांना किमान वेतन व अनुषंगिक लाभ; कंत्राटदाराच्या मनमानीला लगाम घालण्याचे बीड जिल्हा पालकमंत्री यांनी दिले निर्देश



बीड (प्रतिनिधी) जिल्ह्यातील सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायतीच्या अधिनस्त घनकचरा व्यवस्थापनातील कंत्राटी कामगार व औष्णिक विद्युत केंद्र परळी वैजनाथ येथील सर्व विभाग प्रमुख यांच्या अधिनस्त कंत्राटदार यांच्याकडे कार्यरत वीज कंत्राटी कामगारांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन व अनुषंगिक लाभ/प्रचलित विविध कामगार कायद्यांच्या सोयी सवलतीचा लाभ देऊन कंत्राटदाराच्या मनमानीला लगाम घालण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना द्यावेत असे निवेदन राज्याचे अर्थ, नियोजन व बीड जिल्हा पालकमंत्री अजित पवार यांना रोजंदारी मजदूर सेनेचे केंद्रीय महासचिव भाई गौतम आगळे सर यांच्या नेतृत्वाखाली 15 ऑगस्ट रोजी देण्यात आले. त्यावर त्यांनी जिल्हा प्रशासन अधिकारी, नगर परिषद प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय बीड, मुख्य अभियंता, औष्णिक विद्युत केंद्र, परळी वैजनाथ, सरकारी कामगार अधिकारी, बीड यांना किमान वेतन व अनुषंगिक लाभ पान 3 वर

## प्रा . डॉ . विद्या गुळभिले आणि त्यांच्या टीमला भारत सरकारकडून पेटंट प्रदान.



परळी: कै . लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय, परळी येथील प्राणीशास्त्र विभाग प्रमुख आणि संशोधक मार्गदर्शक प्रा . डॉ . विद्या गुळभिले यांच्या " बायोमेट्रिक सीड स्टोरेज कंटेनर" या अभिनव डिव्हाइस ला भारत सरकारकडून पेटंट मिळाले . या उपक्रमामुळे विविध प्रकारची बियाणे जैविक पद्धतीने, सुरक्षित तापमान व आद्रतेमध्ये तसेच बायोमेट्रिक सुरक्षा प्रणालीव्दारे संरक्षित ठेवता येणे शक्य होणार आहे. हे अभिनव डिवाइस केवळ बायोमेट्रिक ओळख म्हणजेच फिंगरप्रिंट किंवा चेहऱ्याची ओळख द्वारेच उघडता येते त्यामुळे पान 3 वर

## संघर्षभूमीवर लोककवी वामनदादा कर्डक यांची जयंती उत्साहात साजरी



अंबाजोगाई (प्रतिनिधी) डॉ बाबासाहेब आंबेडकर भवन संघर्षभूमी येथे लोककवी वामनदादा कर्डक यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. विविध उपक्रमांनी ही जयंती साजरी करण्यात आली.

सुरुवातीस लोककवी वामनदादा कर्डक यांच्या अस्थीयुक्त प्रेरणास्तंभास व त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर सामुहीक वंदना घेण्यात आली. नंतर अंबाजोगाई शहरातील ख्यातनाम गायकांनी वामनदादांना गीतांच्या माध्यमातून अभिवादन केले. गायक प्रा रमेश सरवदे , पान 3 वर



बीड - गृहरक्षक दल जिल्हा कार्यालय बीडचे केंद्र नायक सुरेंद्र जव्हेरी यांची नूकतीच पदोन्नती झाल्या बद्दल पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करते वेळी जिल्हा समुऊपदेशक तथा अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर सोबत प्रशासकीय अधिकारी प्रकाश बताडे प्लांटून कमांडर बालासाहेब निर्मळ सह आदि.( छाया - सतीश मुजमुले)

## सोहम विशाल बुद्रेचा मुंबईतील नामांकित मेडिकल कॉलेजमध्ये MBBS प्रवेश



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :परळीकरांसाठी अभिमानाची बातमी! शहरातील सुप्रसिद्ध पेढा विक्रेते विशाल बुद्रे यांचा सुपुत्र सोहम विशाल बुद्रे याने वैद्यकीय शिक्षणाच्या क्षेत्रात मोठे यश संपादन केले आहे. मुंबईतील नामांकित एच. बी. टी. कूपर मेडिकल कॉलेज, जुहू येथे त्याचा एमबीबीएस अभ्यासक्रमासाठी प्रवेश निश्चित झाला असून या यशामुळे परळीकरांचा अभिमान उंचावला आहे.

लहानपणापासून अभ्यासू वृत्तीचा असलेला सोहम याने कठोर परिश्रम, चिकाटी आणि ध्येयवादी प्रयत्नांच्या जोरावर हे यश मिळवले आहे. त्याच्या या घवघवीत यशाबद्दल नातेवाईक, मित्रपरिवार तसेच परळी शहरात आनंद व्यक्त केला जात असून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

पान 3 वर